आधुनिक विचारांचे
# वर्तमान




बीड । मंगळवार, २० एप्रिल २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : २६ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## 'रेमडेसिवीर'वरील राजकारण थांबवा : खासदार संजय राऊत यांचा विरोधकांना टोला

▶ प्रतिनिधी

मुंबई : देशात सध्या युद्धजन्य परिस्थिती असून यावर चर्चा करण्यासाठी संसदेचे दोन दिवसांचे अधिवेशन बोलावण्यात यावे, अशी मागणी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केली आहे. अनेक राज्यांमध्ये आकडे लपवण्याचे जे कार्यक्रम होते, ती लपवाछपवी आता बंद झाली आहे असा टोलाही यावेळी त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी रेमडेसिवीरवरुन राज्यात सुरु असलेल्या राजकीय घडामोडींवरही भाष्य केले. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

एखाद्या मोठ्या युद्धात बॉम्बमुळे जसे सगळे उद्ध्वस्त होते तसे सगळं उद्ध्वस्त होताना दिसत आहे. अनेक राज्यांमध्ये आकडे लपवण्याचे जे कार्यक्रम होते. ती लपवाछपवी आता बंद झाली आहे. त्याचाही स्फोट झाल्याने आता जागोजागी अनेक राज्यांमध्ये चिता भडकलेल्या दिसत आहेत. रस्त्यांवर रुग्ण दिसत असून जर हे प्रकरण वाढत गेलं, नियंत्रण ठेवले नाही आणि पुन्हा पुन्हा परिस्थिती लपवत राहिलो तर देशात अराजक माजेल असे चित्र स्पष्ट दिसत आहे, असा इशारा संजय राऊत यांनी दिला आहे.

प्रत्येक राज्यात काय चालले आहे? देशाची परिस्थिती काय आहे? सरकार काय करत आहे? राज्यांना काय मदत आवश्यक आहे? देशाची आर्थिक, आरोग्य स्थिती काय आहे? याविषयी



सोशल डिस्टन्सिंग पाळून एक विशेष अधिवेशन बोलावणे गरजेचे आहे. देशाची परिस्थिती गंभीर असल्याचे सर्वांनी मान्य केले आहे. देशाच्या संकटावर चर्चा होणे गरजेचे आहे, असे मत संजय राऊत यांनी व्यक्त केले आहे.

राज्यात रेमडेसिवीरवरुन सुरु असलेल्या राजकारणावर बोलताना ते म्हणाले की, विरोधी पक्षाने मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली पाहिजे. जर त्यांच्याकडे काही माहिती असेल आणि ते सरकारला डावलून रेमडेसिवीर मिळवू शकत असतील तर ते राज्यासाठी मिळवण्यासंदर्भात मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांशी चर्चा केली असती तर त्यांनाही श्रेय घेता आले असते. चौकशीसंदर्भात विचारण्यात आले असता जयंत पाटील आणि दिलीप वळसे पाटील यांनी चौकशीचे संकेत दिले असल्याचे ते म्हणाले. अमित शाह यांनी घाईत लॉकडाऊन घेण्याची गरज नाही असे वक्तव्य केल्यासंबंधी विचारण्यात आले असता त्यांनी सांगितले की, अमित शाह देशाचे गृहमंत्री आहेत. पश्चिम बंगालमध्ये प्रचार करुन ते आता दिल्लीत आले असतील. जर त्यांना घाईत लॉकडाऊन करण्याची गरज नाही असे वाटत असेल तर जी माणसे मरत आहेत, ऑक्सिजन तसेच बेडशिवाय तडफडत आहेत. त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना असतील तर जाहीर कराव्यात, असेही खासदार संजय राऊत म्हणाले.

## फास्टट्रॅकन्यूज

### प्रियंका गांधी यांचे देवेंद्र फडणवीसांवर टीकास्त्र

नवी दिल्ली : राज्यात कोरोना व्हायरसने



जबरदस्त हाहाकार माजवला आहे. रोजच्या रोज नव्या कोरोनाबाधितांचा आकडा आणि मृतांची संख्या वाढताना दिसत आहे. असे असताना, राज्यात मात्र रेमडिसेवीर औषधाच्या मुद्द्यावरून राजकारण सुरू आहे. आता या राजकारणात काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनीही उडी घेतली आहे. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत निशाणा साधला आहे. फडणवीस यांनी रेमडेसेवीरचा साठा करणे हे मानवतेविरुद्ध आहे, असे प्रियांका गांधी यांनी म्हटले आहे. जेव्हा देशाच्या कानाकोपऱ्यातून रेमडेसिवीरची मागणी होत आहे. जीव वाचविण्यासाठी रेमडेसिवीर मिळावे, म्हणून लोक प्रयत्नांची पराकाष्टा करत आहेत. अशा वेळी, एका महत्त्वाच्या पदावर राहिलेल्या भाजपच्या नेत्याने रेमडेसेवीरची साठेबाजी करणे, मानवतेविरुद्ध आहे, अशी टीका प्रियांका गांधी यांनी केली आहे. आपल्या या ट्विट सोबत प्रियांका गांधी यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा पोलिसांना धारेवर धरतानाच एक व्हिडिओ जोडला आहे.

### सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांची दमदार कामगिरी


मुंबई : गेल्या वर्षभरापासून संपूर्ण देशासह



महाराष्ट्रात कोरोनोच्या परिस्थितीत अनेक प्रश्न उपस्थित होत असताना व शासकीय यंत्रणेवर त्याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला असताना देखील राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अशा बिकट परिस्थितीत विभागास प्राप्त झालेल्या निधीचा संपूर्ण खर्च करण्याची रेकॉर्डब्रेक कामगिरी बजावली आहे. विभागाचा गेल्या पाच वर्षातील खर्चाचा आलेख पाहता चालू वर्षात सर्वाधिक खर्च झालेला आहे, ही विशेष बाब म्हणावी लागेल. राज्य शासनाकडून चालू वर्षात (२०२०-२१) मध्ये प्राप्त झालेल्या राज्यस्तरीय योजनांच्या ९१ टक्के निधी तर अनुसूचित जाती घटक कार्यक्रम जिल्हा वार्षिक योजनेच्या प्राप्त झालेला निधी ९९.५३ टक्के खर्च विभागाने केला आहे. विभागाच्या या सर्वोत्तम कामगिरी बद्दल मंत्री धनंजय मुंडे, राज्यमंत्री डॉ.विश्वजित कदम यांच्यासह विभागातील अधिकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

### व्हॉट्सअ‍ॅप गुलाबी रंगाचे होणाऱ्या व्हायरल मेसेजला नका करू क्लिक

नवी दिल्लीः सध्या व्हॉट्सअ‍ॅपवर एक



मेसेज खूप व्हायरल होत आहे. यात म्हटले की व्हॉट्सअ‍ॅप आता हिरव्या रंगात नाही तर पिंक म्हणजेच गुलाबी रंगात बदलण्यात येणार आहे. हा दावा करतानाच एक लिंक सुद्धा दिली आहे. सायबर तज्ज्ञांनी या मेसेजमध्ये दिलेल्या लिंकला क्लिक न करण्याचा सल्ला दिला आहे. जर तुम्ही या लिंकला क्लिक केले तर तुमचा फोन हॅक होऊ शकतो, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे.सायबर सुरक्षा तज्ज्ञ राजशेखर राजहरिया यांनी सोशल मीडियावर लिहिले आहे की, व्हॉट्सअ‍ॅप पिंक संबंधी कोणतीही लिंक आल्यास तुम्ही सावध राहा.

# १ मे पासून व्यापक लसीकरण

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय; आता अठरा वर्षावरील सर्वांनाच मिळणार लस

▶ प्रतिनिधी

दिल्ली : कोरोना विरोधात देशाच्या सुरू असलेल्या लढाईच्या दृष्टीने केंद्र सरकारने सोमवारी एक मोठा व महत्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार आता १८ वर्षावरील प्रत्येकाला कोरोनाची लस दिल्या जाणार आहे. १ मे पासून हे लसीकरण सुरू होणार आहे. याशिवाय लस उत्पादकांना ५० टक्के साठा राज्य सरकारला द्यावा, असे देखील सांगण्यात आले आहे.

यापूर्वी ४५ वर्षावरील नागरिकांना लस देण्याचे नियोजित करण्यात आले होते. मात्र कोरोनाचा वाढता फैलाव पाहता लसीकरणाचा टप्पा वाढवण्यात आला आहे. कोरोना फैलाव रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. देशात कोरोनावरील लसीकरणासाठी सरकारी केंद्र आणि खासगी रूग्णालयामध्ये लस घेता येणार आहे. सरकारी केंद्रांवर मोफत लस दिली जात आहे. तर खासगी रुग्णालयात एका डोससाठी २५० रुपये आकारले जात आहेत. दरम्यान, सोमवारी पंतप्रधानांची काही औषध कंपन्यांसोबत देखील बैठक झाली आहे. भारतात सध्या कोव्हॅक्सिन आणि कोव्हिशिल्ड या लस दिल्या जात आहेत. स्पुटनिक व्हीला सुद्धा आपात्कालीन



मंजुरी देण्यात आली. त्यामुळे लसीकरण मोहीमेला येत्या दिवसात वेग येणार असल्याचे दिसत आहे. भयावह वेगाने फैलावणाऱ्या करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी श्वसनयंत्रे, प्राणवायू आणि औषधांच्या उपलब्धतेचा आढावा घेतला होता. त्याचबरोबर खासगी आणि सरकारी औषधनिर्मिती क्षेत्रांनी पूर्ण क्षमतेने लसउत्पादन करण्याचे आवाहनही त्यांनी केले होते.

कोरोनास्थिती हाताळण्याबाबत माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवलेले आहे. त्यात त्यांनी कोरोना साथीशी लढण्यासाठी लसीकरणाची गती वाढवणे महत्त्वाचे असल्याचे नमूद केले आहे. तसेच लसपुरवठ्यास चालना देण्यासाठी एचआयव्ही-एड्सच्या औषधांप्रमाणे परवाना अनिवार्य करण्याच्या दृष्टीने वेगाने पावले उचलावीत, अशी डॉ.मनमोहन सिंग यांनी सूचनाही केली आहे. देशात गेल्या ९२ दिवसांत १२ कोटी लोकांचे लसीकरण पूर्ण झाले असून वेगाने लसीकरण करणाऱ्या देशात भारत समाविष्ट आहे, असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. अमेरिकेत ९७ दिवसांत हा टप्पा गाठला गेला होता, तर चीनमध्ये १०८ दिवसांत तो गाठला गेला.

## शुभवर्तमान : 'कोरोनाची दुसरी लाट ओसरणार'

▶ वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : महाराष्ट्रात करोनाची दुसरी लाट सुरु आहे. नवीन रुग्णसंख्या दररोज नवनवे उच्चांक गाठत आहे. अशावेळी राज्यातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. या वातावरणात नागरिकांना दिलासा कधी मिळेल या विषयावर मुळ महाराष्ट्राचे नागरिक असलेले अमेरिकन डॉ.रवी गोडसे यांनी लाईव्ह व्हिडिओद्वारे माहिती दिली आहे.



डॉ.रवी गोडसे म्हणाले, नागरिकांनी सकारात्मक राहायला हवे. करोना प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतल्यानंतरही जर कोरोनाची बाधा झाली तर घाबरण्याचे काही कारण नाही. कारण होणारा त्रास हा इतर व्यक्तिंपेक्षा नक्कीच कमी होतो. त्यामुळे केंद्र सरकारने जास्तीत जास्त लसीकरणावर भर द्यायला हवा. महाराष्ट्रात जास्त रुग्णसंख्या वाढते आहे त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहिम राबवावी. सर्वाचे लसीकरण करणे आणि जे करोना रुग्ण आहेत त्यांना सर्व पणाला लावून वाचवणे या दोन गोष्टींवर भर दिल्यास नक्कीच लवकरच महाराष्ट्रातील दुसरी लाट संपूष्टात येईल, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी कोरोनाची भिती न बाळगता उपचार सुरु ठेवले पाहिजे. भितीमुळे मन कमजोर होते आणि त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. कोरोना प्रतिबंधक लस घेतलेल्यांना कोरोना झाला तरी मृत्यू होत नाही. त्यामुळे मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टंसिंगबरोबरच जास्तीत जास्त लसीकरण व्हावे, असेही डॉ.गोडसे म्हणाले.

## माजलगावात शंभर खाटांचे सुसज्ज कोविड हॉस्पिटल

### सभापती अशोक डक यांचा पुढाकार; गोरगरीबांना मिळणार लाभ

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांच्या पुढाकाराने शहरालगत असलेल्या ईगलवूड इंग्लिश स्कूलमध्ये शंभर खाटांचे सुसज्ञ हॉस्पिटल उभारण्यात आले आहे. आज मंगळवार दि.२० एप्रिल रोजी या हॉस्पिटल दुपारी १२ वाजता उद्घाटन होणार आहे. दरम्यान, या सुसज्ञ हॉस्पिटलचा गोरगरीबांना लाभ मिळणार आहे.



संपूर्ण महाराष्ट्रातील जनता सध्या कोरोना या महामारीने त्रस्त आहे. तसेच माजलगाव तालुक्यातील कोरोना रूग्णांची वाढती संख्या पाहता मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांच्या पुढाकारातून माजलगाव शहरालगत जवळच असलेल्या फुले पिंपळगाव परिसरातील ईगलवूड इंग्लिश स्कूलमध्ये सर्व सोईनियुक्त सुसज्य कोविड हॉस्पिटल उभारले असून या हॉस्पिटलचे उद्घाटन सभापती अशोक डक यांच्या हस्ते आज मंगळवार रोजी होणार आहे. या कोविड सेंटरमध्ये कोरोना रूग्णांवर उपचार करण्यासाठी शंभर बेड उपलब्ध राहणार असून त्यामध्ये ३० ऑक्सिजन बेड, ५ आयसीयू बेड असणार आहेत. याठिकाणी दहा बेड हे अत्यंत गोरगरीब असलेल्या रूग्णांवर अत्यल्प दरात राखून ठेवण्यात येणार असल्याची माहिती डॉ.शरद पवार यांनी दिली. माजलगाव शहरातील सुप्रसिद्ध डॉ.शरद पवार, डॉ.श्रेयस देशपांडे, डॉ.प्रविण राठोड, डॉ.सुशिलकुमार सोळंके, डॉ.किशोर भोपळे, डॉ.कैलास नरवडे आदी डॉक्टर्सची टीम या कोविड हॉस्पिटलमध्ये सेवा देणार आहेत.



## संपादकीय

# आर्थिक नाकेबंदीची चाहूल

वाढती रूग्णसंख्या धोक्याची घंटा मानली जात आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते ही आर्थिक नाकेबंदीची चाहूल असू शकते. देशात एकेका दिवसात दोन दोन लाख कोरोना रूग्ण आढळत असून, एकूण रुग्णांची संख्या दीड कोटीच्या पार गेली आहे. कोविड संसर्गातून बरे होण्याचा दर ९० टक्क्यांच्या खाली गेला आहे. लागोपाठ महिनाभर रूग्णसंख्येत वाढच होत असून, सध्या उपचाराधीन रूग्णांची संख्या बारा लाखांवर गेली आहे. कोविड निर्बधांचे पालन लोक कमी प्रमाणात करत आहेत. त्याशिवाय कोविडच्या संसर्गजन्य विषाणूचे नवे प्रकारही भारतात आले आहेत. जर ही स्थिती बदलली नाही, तर संसर्ग वाढून आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण येईल, असा इशारा अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचे प्रमुख डॉ.रणजित गुलेरिया यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी संचारबंदी व अन्य निर्बध जाहीर केले असून, आज-उद्या देशव्यापी लॉकडाऊनही जाहीर होऊ शकतो, अशी शक्यताही वर्तवली जात आहे. याचा मुख्यतः आर्थिक क्षेत्राला फटका बसणार आहे आणि त्याचाच विचार करण्याची गरज आहे. विषाणूजन्य साथीची दुसरी लाट ही अपेक्षेपेक्षा अधिक घातक ठरली असून, लॉकडाऊनसदृश निर्बध आधीच लागू झाल्याने, अर्थव्यवस्था पुन्हा उभारणीबाबत नव्याने कयास करणे भाग पडत आहे. कोरोना लाटेच्या तडाख्याच्या बातम्यांमुळे सेन्सेक्सने आपटी खाल्ली. अमेरिकन डॉलर तर ७५ रूपयांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. भांडवली बाजारात कोरोनाभयाने झालेल्या विक्रीमुळे डॉलरची मागणी वाढली. त्यात रिझर्व्ह बँकेने अनपेक्षितपणे गेल्या बुधवारी रोखेखरेदीचे धोरण जाहीर केले आणि त्यानंतर सलगपणे रूपयाचे मूल्य दोन टक्क्यांनी घसरले. अर्थव्यवस्थेचा दुसरा पैलू असतो भावांच्या स्थितीचा. वाढत्या अन्नधान्याच्या किमती तसेच इंधनाचे दर यामुळे मार्च २०२१ मध्ये किरकोळ ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर ५.५२ टक्के नोंदला गेला आहे. चार महिन्यांतील ही विक्रमी झेप आहे. म्हणूनच वाढत्या महागाईबाबत चिंता व्यक्त करत, रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्याच द्वैमासिक पतधोरणात प्रमुख व्याजदर स्थिर ठेवण्याचे धोरण मागच्याच आठवड्यात जाहीर केले आहे. परिस्थिती इतकी निराशाजनक आहे की, व्यापारी बँकांनी कर्ज वितरण सुरळीत राखण्याला प्राधान्य द्यावे, अशा सूचना देणे रिझर्व्ह बँकेला भाग पडले आहे. ग्राहकांना विनाअडथळा सेवा मिळावी यासाठी सर्व ते प्रयत्न करा, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी बँकांच्या व्यवस्थापकीय संचालकांबरोबरच्या बैठकीत सांगितले. देशातील औद्योगिक उत्पादनदर फेब्रुवारीत उणे ३.६ टक्के नोंदला गेला. फेब्रुवारी २०२० मध्ये तो ५.२ टक्के असा होता. मार्च २०२० मध्ये तर औद्योगिक उत्पादनदर १९ टक्क्यांनी घसरला होता. लॉकडाऊन अथवा तत्सम निर्बधांमुळे अर्थव्यवस्थेला चांगलाच फटका बसणार आहे. म्हणूनच उत्पादन व पुरवठा शृंखलेत अडसर येईल, असे कोणतेही पाऊल सरकारने टाकू नये, असे आवाहन सीआयआय या औद्योगिक संघटनेने केले आहे. दुसरीकडे रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डी.सुब्बाराव यांनी एक अत्यंत गंभीर इशारा दिला आहे. त्यांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास इंग्रजी 'व्ही' नव्हे,

तर 'के' या अद्याक्षराप्रमाणे होईल. शिवाय कोरोना महासाथीमुळे आर्थिक विषमता वाढेल. या विषमतेचा थेट परिणाम ग्राहकांच्या उपभोगक्षमतेवर होईल. सार्वजनिक कर्ज वाढेल, या शक्यतेमुळे जनतेला आर्थिक मदत करता येत नाही आणि चलनफुगवटा होईल या भीतीने व्याजदरही घटवता येत नाहीत, असा सरकार व रिझर्व्ह बँकेसमोरचा पेच आहे, असे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण राव यांनी नोंदवले आहे. परंतु देशात एका वर्गाचे उत्पन्न सुरक्षित असून, त्याची संपत्ती वाढत आहे. तर दुसऱ्या वर्गात रोजगार बुडाल्यामुळे उत्पन्न, बचत आणि क्रियशक्ती नष्ट झाली आहे. त्यामुळे समाजातील तळाच्या वर्गास मदत करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारला काही उपाययोजना कराव्याच लागतील. अनेक अर्थतज्ज्ञांच्या मते, २०२१-२२ मध्ये देशाची आर्थिक स्थिती निराशाजनकच असण्याची शक्यता आहे. विविध राज्यांत निर्बध लागू झाले असल्यामुळे आंतरराज्य व आंतरजिल्हा वाहतुकीवर परिणाम झाला आहे. माल व सेवांच्या हालचालींवर विपरीत परिणाम होणार आहे. विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२१-२२ मध्ये भारताचा विकासदर साडेबारा टक्के असेल, असा होरा व्यक्त केला आहे. जानेवारीत तर आयएमएफने साडेअकरा टक्के विकासदराचा अंदाज व्यक्त केला होता. फिच, मूडीज, स्टँडर्ड अँड पुअर या आंतरराष्ट्रीय पतमापन संस्थांनीही देशाच्या विकासाबाबत आशादायक भाकिते वर्तवली आहेत. परंतु गेल्या आठवड्यानंतर मात्र हे चित्र बदलले आहे. याचे कारण कोरोनाबाधितांची संख्या आकस्मिकरीत्या वाढू लागल्यामुळे अनेक राज्यांत संचारबंदी, जमावबंदी, अंशतः लॉकडाऊन जाहीर झाले आहे. त्यामुळे नोमुरा या प्रख्यात वित्तसेवा संस्थेने भारताचा विकासदर यंदा ११.५ टक्केच असेल, असे म्हटले आहे. यापूर्वीचा त्यांचा आकडा १२.४ टक्के इतका होता. गोल्डमन सॅक्सनेही भारताच्या विकासदराचा अंदाज दोन टक्क्यांनी घटवला आहे. देशव्यापी लॉकडाऊन जाहीर झाल्यास, दर आठवड्यास आठ हजार कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होईल. अगदी सध्याचीच नियंत्रणे जरी चालू राहिली, तरी जीडीपी किंवा सकल राष्ट्रीय उत्पादन ०.२ टक्क्यांनी घटेल, असा अंदाज 'बार्लेज'च्या ताज्या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. एक लक्षात घेतले पाहिजे की, देशाची ६० टक्के अर्थव्यवस्था ही वाहतुकीवर अवलंबून आहे. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, राजस्थान येथे कोरोना वाढत असून, त्यामुळे माल व सेवांच्या वाहतुकीस मोठीच झळ पोहोचली आहे. या कारणाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच १.४ टक्क्यांनी विकासदर घटण्याची शक्यता असल्याचा इशारा बार्लेज इंडियाचे प्रमुख अर्थतज्ज्ञ राहुल बजोरिया यांनी दिला आहे. मुंबई, बंगळुरू आणि अहमदाबाद या शहरांतील व्यापारी वाहतुकीस आताच लक्षणीय प्रमाणात फटका बसला आहे. केंद्र व राज्य सरकारला परिस्थिती लक्षात घेऊन यथायोग्य पावले टाकावीच लागतील, हे ओळखणे गरजेचे आहे.

# रेमडेसिविर खरंच प्रभावी आहे?

**सध्या कोरोनावरच्या रेमडेसिविर या औषधाची सगळीकडे चर्चा आहे. कोरोना पेशंटची संख्या वाढल्यामुळे औषधाच्या मागणीतही वाढ झालीय. त्यासाठी मेडिकल बाहेर लांबच लांब रांगा लागतायत. भरमसाठ किंमत आकारली जातेय. रेमडेसिविरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे केंद्र सरकारने औषधाची निर्यातही थांबवलीय. पेशंटला एवढं विश्वासाई वाटणारं हे औषध खरंच कोरोनावर काम करतं का?**

भारतात कोरोनाची दुसरी लाट आलीय. पेशंटच्या संख्येत वाढ होतेय. गेल्यावर्षी औषध, लस, त्याच्या ट्रायल यावर चर्चा होत राहिली. अजूनही होतेय. सगळे काळजीत होते. पर्यायी औषधांचा विचारही करण्यात आला. एचआयवीचं रेट्रोवायरिड आणि लॅण्टीवायरस औषध, मलेरियावरच्या हायड्रोक्लोरोक्वीन या औषधाकडे कोरोनावरचा उपाय म्हणून बघितलं गेलं. हायड्रोक्लोरोक्वीनची ट्रायल घेण्यात आली.

हायड्रोक्लोरोक्वीन नंतर रेमडेसिविर औषध चर्चेत आलं. सध्या रेमडेसिविरसाठी मेडिकल स्टोअर बाहेर गर्दी होतेय. लांबच लांब रांगा लागतायत. मध्यप्रदेशातल्या इंदौरमधे गर्दीमुळे ट्राफिक जाम झाल्याची बातमी आली. भारतात या औषधाचा तुटवडा निर्माण झाला असताना त्याचा काळाबाजारही जोरात सुरू झालाय. त्यासाठी कोरोना पेशंटच्या नातेवाईकांकडून भरमसाठ किमती आकारल्या जातायंत.

**रेमडेसिविर इबोलावरचं औषध**

रेमडेसिविर हे अँटी वायरल औषध आहे. इंजेक्शनमधून ते दिलं जातं. २००९ ला हिपॅटायटीस सी या वायरससाठी म्हणून ते बनवलं होतं. पण त्याला बाजारात आणायची परवानगी मिळाली नाही. हे औषध बनवणाऱ्या अमेरिकेतल्या गिलिएड या कंपनीनं २०१५ ला एक दावा केला. रेमडेसिविर हे औषध आफ्रिकेतला इबोला वायरसचा संसर्ग रोखू शकतो असं कंपनीनं म्हटलं होतं. इबोलासाठी ते वापरलं जाऊ लागलं. तसंच इतर वायरसचा संसर्ग रोखायची क्षमताही या औषधात असल्याचा दावा गिलिएडनं केला होता. मर्स आणि सार्स या साथीच्या रोगांमधेही त्याचा वापर करण्यात येऊ लागला. सध्याचा कोरोना वायरस या दोन वायरसच्याच कुटुंबात येतो.

मागच्या वर्षी कोरोना वायरसचा संसर्ग वाढायला लागला तशी रेमडेसिविरची चर्चाही होऊ लागली. ट्रायल घेण्यात आल्या. कोरोना वायरस माणसाच्या शरीरात प्रवेश करतो तेव्हा आरडीआरपी नावाचं द्रव्य त्याच्या शरीरात सोडतो. त्यामुळे शरीरात वायरस अधिक वेगाने पसरतो. त्याला रोखायचं काम रेमडेसिविर औषध करतं असं म्हटलं जातं. त्यामुळेच या औषधाला जास्त मागणी आहे.

**उत्पादनाच्या सूचना, निर्यात बंद**

भारतात रेमडेसिविर औषधाचं उत्पादन ७ कंपन्या करतात. यात सिपला, झायडस कॅडिला, हेटरो, मायलन, ज्यूबीलंट लाइफ, सायन्सेस, डॉक्टर रेडीज, सन फार्मा या कंपन्यांचा समावेश आहे. तयार केल्यानंतर ३ महिन्यात हे औषध एक्सपायर होतं. ऑक्टोबर नंतर कोरोनाच्या आकडेवारीत जशी घट झाली तशी रेमडेसिविरची मागणीही घटली. तीनच महिने औषध टिकत असल्याने कंपन्यांनी लगेचच आपलं उत्पादन कमी केलं. आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, भारतात रेमडेसिविरची उत्पादन क्षमता ३१ लाख ६० हजार छोट्या बॉटल महिना इतकी आहे. त्यापैकी हेटरो कंपनी १० लाख ५० हजार बॉटलचं उत्पादन करते. तर सिपला ६ लाख २० हजार, झायडस कॅडिला ५ लाख, मायलन कंपनी महिना



४ लाख बॉटलचं उत्पादन करते. बाकी कंपन्यांकडून प्रत्येक महिन्याला १ ते २ लाख बॉटल इतकं उत्पादन घेतलं

**प्रासंगिक**

**अक्षय शारदा शरद**

जातं. कोरोना पेशंटच्या आकडेवारीत अचानक वाढ झाली तशी या औषधाची मागणीही अचानक वाढली. ७ एप्रिलला या कंपन्यांना उत्पादन वाढवण्याच्या सूचना केंद्र सरकारकडून देण्यात आल्या. भारतात रेमडेसिविरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे केंद्र सरकारने औषधाची निर्यातही बंद केली.

**काळाबाजारही तेजीत**




मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही काल जनतेशी संवाद साधताना दिवसाला ४० ते ५० हजार रेमडेसिविरची मागणी असल्याचं म्हटलंय. पेशंटची संख्या वाढत राहिली तर हा आकडा १ लाखापर्यंत पोचेल असंही ते म्हणाले. त्याआधी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनीही औषध कंपन्यांना रेमडेसिविरचं उत्पादन वाढवायची विनंती केली होती. रेमडेसिविरची मागणी वाढत असताना मोठ्या प्रमाणात काळाबाजार होतोय. भरमसाठ किंमती आकारल्या जातायत. वन रुपी क्लिनिकचे संस्थापक आणि सीएओ डॉ.राहुल घुले यांनी १५०० बेड क्षमतेचा कोविड हॉस्पिटलचा सेटअप उभा केलाय. त्यांनाही मेडिकल स्टोअर्स, औषध कंपन्यांच्या मनमानी कारभाराचा सामना करावा लागतोय. त्यांनी हा काळाबाजार अमानवी आणि व्यावसायिक धोरणाच्या विरोधात असल्याचं ट्विट करत म्हटलंय. या काळाबाजाराविरोधात सरकारही पावलं उचलताना दिसतंय. मेडिकल, औषध कंपन्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या साठा नेमका कितीय याची माहिती त्यांच्या वेबसाईटवर टाकायचे आदेश दिलेत. तसंच रेमडेसिविर किंमत सर्वसामान्य माणसांच्या आवाक्यात राहील याचा विचार करून तशी किंमत आकारल्या जातील. तशा सूचनाही सरकारने केल्यात.

**रेमडेसिविर बिनकामाचं?**

कोरोना पेशंटवर रेमडेसिविरचा सकारात्मक परिणाम होतोय असा कोणताच पुरावा नसल्याचं 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन' अर्थात डब्ल्यूएचओचं म्हणणं आहे. डब्ल्यूएचओच्या तंत्रज्ञान विभाग प्रमुख मारिया वॅन कोराखोवा आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ सौम्या स्वामीनाथन यांनी इंडिया टुडे टीवीला छोटेखानी मुलाखत दिलीय. त्यात त्यांनी रेमडेसिविरच्या आतापर्यंत ५ क्लिनिकल ट्रायल झाल्याचं म्हटलंय. कोरोनाच्या मृत्यूच्या संख्येत रेमडेसिविरमुळे कोणतीही घट झाली नसल्याचं या ट्रायलमधून समोर आल्याचं निरीक्षण दोघांनी नोंदवलंय. वेंटिलेटरवर असलेल्या पेशंटलाही याचा फायदा होत नसल्याचं ते म्हणतात. गेल्यावर्षी नोव्हेंबरमधे जगभरातल्या ३० देशांमधल्या जवळपास ११ हजार २६६ वयोवृद्ध कोरोना पेशंटवर रेमडेसिविरची ट्रायल घेण्यात आली होती. पण त्यातून फारसं काही हाती आलं नसल्याचं या तज्ञांचं म्हणणं आहे.

तर अमेरिकेतल्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या फेब्रुवारीतल्या गाईडलाईननुसार, हॉस्पिटलमधे भर्ती असलेल्या पेशंटचं बरं व्हायचं प्रमाण वाढावं म्हणून हे औषध काम करेल. तर मागच्या वर्षी नोव्हेंबरमधे द लॅन्सेट जर्नल'मधे कोरोनाचा संसर्ग व्हायच्या १० दिवस आधी रेमडेसिविर दिलं गेलं तर ज्यांना कोरोनाचा जास्त धोका आहे त्यांचा जीव वाचवता येऊ शकतो असं म्हटलं होतं. 'द न्यु इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन' यांचाही गेल्यावर्षी १० एप्रिलला असाच रिसर्च आला होता.

# तिघांचे जाणे वेदनादायी

**जीवघेण्या कोरोनाने अनेकांचे जीव घेतले आहेत. माजलगावातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जकी बाबा, शिक्षक मंजुळदास गवते आणि प्रा.प्रकाश गवते यांचे जाणे वेदनादायी ठरले आहे. छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक निळकंठ जाधव यांनी वाहिलेली शब्दांजली.**

**शब्दांजली**

**निळकंठ जाधव**



मंजुळदास गवते



जकी बाबा



प्रा.प्रकाश शेजुळ

जो आवडे सर्वांना,
तोची आवडे देवाला

या युक्ती प्रमाणे माजलगाव परिसरात नियतीने कर्तत्वान, मेहनती, माजलगाव करांच्या मनावर अधिराज्य करणारे, सहवासात येणाऱ्या प्रत्येकाच्या ऱ्हदयात प्रेमाने घर केलेले स्नेहसंबधातले मुख्याध्यापक मंजुळदास गवते, शेख इस्तेखार जकी, प्रा.प्रकाश शेजुळ या तिन व्यक्तीवर साठी पार करण्या पुर्वी नियतीने घाला घातला. कोरोना अदृष्य विषाणुने हल्ला केला. काही दिवस या विषाणुचा प्रतिकार करत झुंज सुरु ठेवली. अखेर या युद्धात तिघांनाही हार पत्करावी लागल्याने परिसर हळहळला.अनेकांची मने सुन्न झाली.

***

**मंजुळदास गवते**

तालुक्यातील गोविंदपूर सारख्या ग्रामीण भागातून येवुन ३६ वर्ष ज्ञानदानाचे काम करत असताना अनेक पिढ्या व हाजारो विद्यार्थी गुरुजींनी घडवले. माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गावात गवते गुरुजींचा विद्यार्थी विविध क्षेत्रात मोठा झालेला पाहयला मिळतो आहे. निवृतीनंतर एका महिण्यात गुरुजींचे निधन झाले. गवते गुरुजींनी श्री सिद्धेश्वर विद्यालयात शिक्षण घेतले त्याच शाळेत शिक्षक, मुख्याध्यापक म्हणुन काम करताना विद्यार्थी, पालक यांच्या ह्रदयात प्रेमाचे घर केले होते. गणित विषयात पारंगत सहज सोप्या पद्धतीने शिकविण्याची हातोटी असणारे गवते गुरुजी जिवनाच गणित यशस्वी करण्यात अपयशी ठरले. शिस्तबद्ध, कर्तव्यपरायण, मधुर वाणी मुळे प्रत्येकाला गवते गुरुजी आपले वाटत. विद्यार्थी त्यांना कितीही वर्षांने भेटले तरी त्याला आजही नावाने ओळखत होते. त्यांची स्मरण शक्ती अदभुत होती. त्यांना मुख्याध्यापक म्हणून काम करण्याची संधी अल्पकाल मिळाली. मुख्याध्यापक पदी पदोन्नती झाल्यानंतर तालुक्यातील सहकारी म्हणून काम करताना अनेक प्रसंगाचे स्मरण होते. ३० वर्ष गवते गुरुजींचा सहवास लाभला. त्यांना विसरण शक्य नाही. त्यांच्या आठवणी अंतःकरणात सदैव राहातील.

***

**जकी बाबा**

शांत, सुस्वभावी आणि कोरोना महामारी मध्ये सदैव नागरिकांची व रुग्णांची मनोभावे सेवा करणाऱ्या गरजवंत, भुकेल्या, विकलांग लोकांची सेवा हिच 'ईश्वर सेवा' मानणारे ,लहानपणापासून या कार्यात अविरत स्वतःला वाहून घेणारे जकीबाबा अनेक विविध कार्यक्रमात वेगवेगळ्या भुमिकेत काम करत. धर्म, जात संप्रदाय यांच्या पलीकडे जकीबाबाचें सर्व समाजातील लोकांशी प्रेमाचे नाते होते. समाजातील विधवा पुर्नविवाह, कौटुंबिक भांडणे, दोन समाजातील भांडणे यात न्यायाची मद्यस्थी करुन अडल्या नडल्यांची कामे यात त्यांचा सक्रीय सहभाग असे. अनेक तरूणांना मार्गदर्शन करुन योग्य दिशा व वळण लावण्यासाठी मोठे योगदान दिले. विविध संघटनांच्या आंदोलनातील सहभाग प्रकर्षाने दिसून येतो. सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक चळवळीत ते स्वतःला जोकुन देत. पवित्र कुरानच्या आयाती, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांचे अभंग, गितेचे श्लोक , संत कबीरांचे दोहे यांचे दाखले , उदाहरण देवुन समाज प्रबोधन ते करत त्यांच्या गेल्या २५ वर्षाच्या सहवासात अष्टपैलु व्यक्तिमत्वाचा अनुभव आला. माझ्या शाळेत नेहमी हक्काने येवुन विद्यार्थ्यांना मदत करत असत. फुटबॉल व व्हॉलीबॉलचे ते उत्तम खेळाडू होते. त्यांच्या सोबत गेली अनेक वर्षापासून व्हॉलीबॉल खेळत असुन आज सहकारी खेळाडू, मित्र आमच्यातुन अचानक निघून गेला. याची उणीव आम्हास सतत भासत राहील.

***

**प्रा.प्रकाश शेजुळ**

पतझड हुए बिना पेडो पर
नए पत्ते नही आते,
कठिनाई और संघर्ष सहे बिना
अच्छे दिन नही आते।

गोदावरीच्या काठावरी आबेगाव या गावातील हा तरूण. अतिशय संघर्षमय परिस्थितुन खिळाडु वृतीने जीवन कसे जगावे याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे प्रा. प्रकाश शेजुळ अत्यंत गरीबीतुन जगण्याची सुरुवात करून प्राथमिक शिक्षणापासूनचा संघर्ष आजही कायम होता. आपला संघर्ष आम्ही डोळ्यानी पाहिलाय, तो संघर्ष व आपण आमच्या समोर कायम रहाल. कित्येक वर्षापासून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात अध्यापन करताना आजही पूर्णवेळ होता आले नाही. शारीरिक शिक्षणाचे प्राध्यापक म्हणून अल्प वेतनावर काम करत असताना नेहमीच चेहऱ्यावरचे हास्य कायम असायचे. सहकार्याशी नेहमी मैत्रीपुर्ण संबध होते. थकलेल्या आई-वडिलांची सेवा, मुलांचे शिक्षण, परिवाराचा उदर्निवाह अल्पवेतनावर भागवताना खरी अग्नी परीक्षा होती. शांत, संयमी व्यक्ती, अतिशय तळमळीचे व मेहनती प्राध्यापक म्हणून प्रकाशची ख्याती होती. त्यांनी अनेक राज्य, राष्ट्रीय खेळाडू घडविले. खेळाडूंना नेहमी योग्य मार्गदर्शन करुन हवी ती मदत करत असल्यामुळें शेकडो विद्यार्थी व मित्रांच्या मनात आदराच, आपुलकीचे स्थान निर्माण केले. जवळपासच्या खेडेगावातील विद्यार्थांना महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करत असत .एक मनमिळावु, एक आदर्श क्रीडा शिक्षक माजलगाव क्रीडा क्षेत्रातील खेळाडु व्रतीचा एक महत्वपूर्ण खांब प्रकाश शेजुळच्या रुपाने कोसळला त्यांच्या जाण्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी पोरका झाला.

प्रकाश शेजुळ म्हणजे हसतमुख, मनमिळाऊ, अतिशय दिलखुलास व्यक्तीमत्व, साहित्य प्रेमी , आपल्या कवितांनी साहित्य प्रेमींना मंत्र मुग्ध करणारा, भक्तीगीतं, भारुडं गाऊन महाविद्यालय आपलस करणार 'शोधिशी मानवा राऊळी मंदीरी...' गीताचे आपल्या आवाजातील बोल आजही कानात घुमतात.लग्नात मंगलाष्टकांनी वऱ्हाडी खूष करणारा, गायक, कवी, हरहुन्नरी अष्टपैलू व्यक्तीमत्व. कुणालाही भेटल्यावर हक्काने आवाज देणारा सर्वांना हसत ठेवणारा प्रकाश आता आपणास दिसणार नाही. कबड्डी, व्हॉलीबॉलचा उत्तम खेळाडू सतत मैदान खळखळत ठेवणारा विनोदी, कुशल संघटक, शिस्तप्रिय, निरागस, निगर्वी, निर्मळ मनाचा अत्यंत तळमळीने व जीवलाऊन कोणतेही काम करणारा माझा शालेय, महाविद्यालयीन वर्ग मित्र, गुरु, क्रीडा क्षेत्रातील सहकारी, ४० वर्षापासूनचा मित्र काळाच्या पडद्याआड गेला. नियमित सकाळी ५ वाजता प्रकाशला रस्त्याने धावताना माजलगावकरांनी पाहिले आहे. धावणे, चालने, योगा, प्राणायाम यात त्याने कधीही खंड पडू दिला नाही.तो नेहमी म्हणायचा चालणे फिरने नियमीत व्यायामाने माझी तब्येत नेहमी ठणठणीत असते.एका सुक्ष्म विषाणुने त्याचा घात केला.

या तिन्ही मित्राच्या जाण्याने माजलगावच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. विविध क्षेत्रातील आपल्या सुस्वभावाने अंतःकरण जोडणारी हि मानसं होती. सर्वांना मदत करण्यात पुढे असणारी हि देव मानसं आपणातुन निघुन गेली आहेत. सर्व स्नेही मित्र परिवार आपल्या परिवाराच्या दुःखात आपल्या परिवारा सोबत आहोत. अशा निरागस सर्वाच्या आवडत्या माणसांना अनंताच्या पथावर नेत असताना काळाचे काळीज थरथरल्या शिवाय राहिले नसेल. श्रद्धांजली तरी कशी वहाणार मित्रांनो खर वाटत नाही विश्वास बसत नाही.

दुःखी अंतःकरणाने तिन्ही मित्रांना अभिवादन. माजलगावच्या इतिहासात या तिघांची नोंद सोनेरी अक्षरात कोरलेली राहिल. शेवटी अस मनाव वाटत

गुजर रही है, जिंदगी
एक ऐसे मुकाम से ।
अपने ही दुर हो जा
रहे है जरा से जुकाम से ।।

काळजी घ्या रूग्णालयात जाण्याची वेळ येवू देवू नका.



## रस्त्यावर फिरणाऱ्यांची स्पॉट अँन्टीजेन टेस्ट

माजलगाव : कोरोना प्रतिबंधक उपाय म्हणून तहसिलदार वैशाली पाटील, माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे आणि माजलगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी शहरात कोरोना बाबत जनजागृती केली. व्यवसायिक आणि शहरात रस्त्यावर फिरणाऱ्यांची नवीन बसस्थानक परिसरात अँन्टीजेन टेस्ट केली. यामध्ये रविवारी ९४ जणांच्या तपासणीत पाच जण पॉझीटीव्ह आले.

# 'श्री मंगलनाथ'कोरोनाग्रस्त कर्मचाऱ्यांच्या मदतीला

### चेअरमन रामेश्वर कानडे यांचा पुढाकार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य श्री मंगलनाथ मल्टीस्टेटने कोरोना काळात देखील आरोग्य सेवक व प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून खातेदारांसाठी अत्यावश्यक सेवेमध्ये येणारी आर्थिक सेवा वेळेत पुरविली असून या काळात संक्रमित होणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपये एवढी मदत देणार असल्याचे संस्थेचे चेअरमन रामेश्वर कानडे यांनी सांगितले.



संस्थेमधील कर्मचारी यांनी शासनाद्वारे दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार काम करताना देखिल जे कर्मचारी कोरोना संक्रमित झाले आहेत. अशा कर्मचाऱ्यांची कोणतीही पगार कपात न करता उपचारासाठी रजा देण्यात येत असून त्यांना रक्कम रुपये दहा प्रत्येकी आर्थिक मदत देणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर कानडे यांनी सांगितले. संस्थेने मागील वर्षात व यावर्षी देखिल कोरोना लाटेमध्ये सर्व कर्मचारी यांची लॉकडाऊन काळातील पगार कपात केला नाही. किवा कर्मचारी कपात न करता संस्थेने नवीन कर्मचारी भरती राबवून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. संस्थेच्या खातेदारांसाठी या कठीण काळात देखील सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी इतर संस्थांनी देखील श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा आदर्श समोर ठेवून आपल्या संस्थेतील कोरोनाग्रस्त कर्मचारी यांना आर्थिक मदत द्यावी व सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवावे आणि शासनाद्वारे दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार गर्दी टाळावी असे आवाहन अध्यक्ष रामेश्वर कानडे यांनी केले आहे.

# कोविड सेंटरमध्ये असुविधा

### रूग्णांमध्ये संताप; प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील व्यंकटेश मंगल कार्यालयात प्रशासनाने कोविड केअर सेंटर उभारले आहे. या सेंटरवर सुविधांचा अभाव असून कोरोना रूग्णांत तीव्र संताप व्यक्त केला जात असून याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

येथील व्यंकटेश लॉन्स येथे १०८ कोरोनाबाधित रूग्ण उपचार घेत आहेत. या ठिकाणी वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत नसून सर्वत्र अस्ताव्यस्त साहित्य पडलेले आहे. कचरा कुंड्यांची विल्हेवाट न लावल्याने दुर्गंधी पसरत आहे.

रूग्णांना खाटा न मिळाल्याने जमिनीवर झोपावे लागत आहे. भोजन व्यवस्थेचे कंत्राट बीड येथील एका एजन्सीकडे आहे. भोजन वेळेवर न देणे, भोजन अतिशय निकृष्ट दर्जाचे असून नियमानुसार जेवण मिळत नसल्याने येथील रुग्णांत तीव्र संताप व्यक्त केला जातोय. प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी येथील रूग्ण करत आहेत.

# माजलगावात एकाच दिवशी ८ बळी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात रविवारी एकाच दिवशी कोरोनाने ८ जणांचा बळी घेतला आहे. या घटनेपासून नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज असल्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.



कोरोनाचा प्रसार प्रचंड वेगाने वाढत असून, होणाऱ्या तपासणीमध्ये दररोज पन्नास ते सत्तर रूग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळून येत आहेत. त्यामुळे या रूग्णांवर उपचार करणाऱ्या येथील शासकीय कोविड सेंटर व दोन हॉस्पिटल हाऊसफुल्ल झाले आहेत.

येथे किमान चारशे रूग्णांवर उपचार सुरू आहेत. यातच रविवारी सकाळी सहा ते दुपारी तीन वाजेपर्यत तब्बल ८ रूग्णांना कोरोनाने कवटाळल्याने मृत्यू झाला, या रूग्णांवर मंगलनाथ स्मशानभूमीत नियमानुसार अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सरपंचपदी भारत सातपुते

▶ प्रतिनिधी

माजलगाव : ढोरगावचे नवे सरपंच भारत सातपुते यांचा पात्रुड येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार यांच्यासमवेत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते भगवानराव सरवदे, डॉ.सदाशिव सरवदे, बालासाहेब सरवदे, नवनाथ तायडे, सोमेश्वर आबुज, ग्रा.पं.सदस्य छगन सरवदे, सुखदेव मुळे, दत्ता आबुज, यशवंत सातपुते, बाळु सातपुते उपस्थित होते. गावच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सातपुते म्हणाले.



पात्रुड : भारत सातपुते यांचा सत्कार करतांना डॉ.वसिम मनसबदार, भगवानराव सरवदे आदी.

# 'रेमडेसिविर'चा तुटवडा दूर करा

### प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्थेचे खासदार डॉ.प्रितम मुंडे यांना निवेदन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात कोरोना महामारीचा उद्रेक होत असून परीसरातील अन्य तालुक्यातील रूग्ण आरोग्य सुविधा असल्याने माजलगावकडे धाव घेत आहेत. मात्र येथे रेमडेसिविर या जीवरक्षक इंजेक्शनचा तुटवडा निर्माण झाला असून प्रशासनाने रेमडेसिविरचा पुरवठा करावा अशी मागणी रूग्णांच्या नातेवाईकांनी खासदार प्रितम मुंडे यांच्याकडे केली आहे. दरम्यान, तालुका आणि परिसरात रेमडेसिविर इंजेक्शन झालेला तुटवडा दूर करा अशा मागणीचे निवेदन खासदार डॉ.प्रितम मुंडे यांना प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष किशोर कानडे यांनी रविवारी दिले.



रेमडेसिविर या कोरोना महामारीतून प्राण वाचवणाऱ्या अत्यावश्यक इंजेक्शनचा प्रशासनाच्या नाकाखाली काळाबाजार चालू असून माजलगाव शहरात खाजगी कोविड सेंटर असून येथे माजलगाव तालुक्यासह गेवराई, धोंतर जोडा आष्टी, अंबड परीसरातील अनेक रूग्ण उपचार घेत आहेत. फुफ्फुसातील इन्फेक्शन झालेल्या कोरोनाबाधित रूग्णांना रेमडेसिविर या इंजेक्शनची अत्यंत आवश्यकता असते. मात्र शहरात या इंजेक्शनचा तुटवडा झाला असल्याने प्रशासनाने या जीव वाचवणाऱ्या इंजेक्शनची उपलब्धता करुन द्यावी अशी मागणी प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर शिवलिंग कानडे यांनी खासदार प्रितम मुंडे यांच्याकडे निवेदन देवून केली आहे. खासगी रूग्णालयांमध्ये इंजेक्शन उपलब्ध नसल्याने रूग्णांच्या नातेवाईकांना बाहेर आणण्यास प्रवृत्त केले जात आहे. माजलगाव बाहेर या इंजेक्शनचा तुटवडा असून या परिस्थितीमध्ये बाहेर सरकारी कमी किंमतीत मिळणारे रेमडेसिविर इंजेक्शनची किंमत कमीत कमी पाच हजार ते १५ हजार रुपये सांगितली जात असल्याचे रूग्णांचे नातेवाईकांकडून सांगितले जात आहे.

# माजी मुख्याध्यापक ज्ञानोबा उजगरे यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील जिल्हा परिषद हायस्कुलचे माजी मुख्याध्यापक भारतीय बौध्द महासभेचे केंद्रिय शिक्षक समता सैनिक दलाचे ज्ञानोबा उजगरे (वय ८०) यांचे ऱ्हदय विकाराने दुःखद निधन झाले.



माजलगाव तालुक्यात ८०च्या दशकात शिक्षण क्षेत्रावर दबदबा निर्माण करणारे ज्ञानोबा उजगरे यांना दि.१८ रोजी सकाळी ऱ्हदय विकाराचा तिव्र झटका आल्याने निधन झाले. त्यांनी सामाजिक क्षेत्र धार्मिक क्षेत्रात भरिव कार्य केले. माजलगाव सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक व सध्याऔद्योगिक वस्त्रोउद्योग संस्थेचे संचालक होते. तर भारतीय बौध्दमहासभेचे केंद्रिय शिक्षक व समता सैनिक दलाचे माजलगाव तालुक्याचे प्रमुख होते. सर्व बाबींसह ते एक उत्तम शेतकरी होते. नेहमी आपल्या शेतात जातीने लक्ष देवून आधुनिक शेतीकडे त्यांचा कल होता. मूळ मोहखेड येथील रहिवासी आसलेल्या ज्ञानोबा उजगरे यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, दोन मुली, नातवडे असा परिवार होता. त्यांच्यावर मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. उजगरे यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# प्रसिद्ध छायाचित्रकार दगडूबप्पा खोत यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील मुख्य रस्ता, मस्जिद चौक परिसरातील रहिवाशी जुन्या काळातील प्रसिद्ध छायाचित्रकार दगडूबप्पा खोत (वय ८५) यांचे वृध्दाप काळाने देशपांडे हॉस्पिटल येथे सोमवार दि.१९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार अत्यंत शोकाकूल वातावरणात करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

माजलगाव येथील प्रसिद्ध रमेश डिजीटलचे संचालक अमोल, शिवप्रसाद खोत यांचे ते आजोबा होत. खोत यांच्या परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# प्रा.प्रकाश शेजूळ यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक प्रकाश शेजूळ यांचे अल्पशा आजाराने गुरूवार दि.१५ एप्रिल रोजी उपचारा दरम्यान निधन झाले.



प्रा.प्रकाश शेजुळ हे माजलगाव तालुक्यातील आबेगाव येथील रहिवाशी असून सुंदरराव सोळंके कनिष्ठ महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विषयाचे प्राध्यापक होते. माजलगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान गुरूवारी रात्री ७:३० वाजण्याच्या दरम्यान त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते मनमिळावू व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मूल, एक मुलगी आहे. शेजुळ यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# कांताबाई ढगे यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील मनूर वसाहतीतील रहिवाशी कांताबाई ज्ञानेश्वर ढगे (वय ४०) यांचे अल्पशा आजाराने बीड येथील शासकीय रूग्णालयात दि.११ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मनूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार अत्यंत शोकाकूल वातावरणात करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, पाच मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. भाजप युवा नेते मल्हारी ढगे यांच्या त्या मातोश्री होत. ढगे यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.



# शंकरराव होके यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : पाटील गल्ली भागातील जेष्ठ नागरिक तथा माजी नगरसेवक शंकरराव गणपतराव होके (वय ८५) यांचे वृद्धाकाळाने रविवारी सकाळी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर रविवारी सकाळी ११ वाजता स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सूना नातवंडे असा परिवार आहे. होके परिवाराच्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.









# कोविड सेंटरला खासदार मुंडेंची भेट

## रूग्णांशी थेट संवाद; उपाययोजनांबाबत दिल्या सूचना

प्रतिनिधी

माजलगाव : बीडच्या खासदार प्रितम मुंडे यांनी रविवारी माजलगाव येथील कोविड केअर सेंटरला भेट देवून तेथील परिस्थितीची पाहणी केली. स्थानिक आरोग्य प्रशासनाला उपाययोजनांबाबत सूचना दिल्या.

माजलगावच्या कोविड केअर सेंटर मधील उपचारार्थी रुग्णांशी खासदार प्रितम मुंडे यांनी रविवारी संवाद साधला व येथील आरोग्य व्यवस्थेची माहिती घेतली. रूग्णालयात उपलब्ध बेड्स, ऑक्सिजन आणि औषध पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेतला, यंत्रणेवरील तणाव कमी करण्यासाठी स्थानिक आरोग्य विभागाने खाजगी डॉक्टर्स आणि आरोग्य सेवकांशी समन्वय साधावा व त्यांची मदत घ्यावी अशा सूचना देखिल वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच व्यंकटेश लॉन्समधील आयसोलेशन सेंटरला भेट देऊन रूग्णांच्या समस्या जाणून घेतल्या. स्वच्छतेसह अन्न पदार्थाच्या दर्जा बाबत येथील रूग्णांची तक्रार आहेत, त्यासंदर्भात तात्काळ उपाय योजना करण्याच्या सूचनाही याप्रसंगी दिल्या. दरम्यान, रूग्णांच्या समस्यांबाबत स्थानिक डॉक्टरांशी चर्चा करून प्रशासनाला सहकार्य करण्याबाबत निर्देश दिले.

# चला रक्ताचे नाते जोडूया...

## श्रीरामनवमीनिमित्त माजलगावात भव्य रक्तदान शिबिर

प्रतिनिधी

माजलगाव : श्री शिवशंभू चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य आणि प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामनवमी निमित्त बुधवार दिनांक २१ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायं ४ वाजेदरम्यान रक्तदान शिबिर आयोजित केले आहे, अशी माहिती संयोजक प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर कानडे यांनी दिली आहे.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक हे करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजपा नेते रमेश आडसकर असतील तर प्रमुख उपस्थिती म्हणून छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप हे असतील. विशेष उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राऊत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह जगदिश साखरे आदींची उपस्थिती असेल. हे रक्तदान शिबिर जुना मोंढा येथील गणपती मंदिरात होणार आहे, अशीही संयोजक किशोर कानडे यांनी दिली.

### रक्तदात्यांना जार भेट



सदर रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना संस्थेच्या वतीने पाच लिटर पाण्याचा जार भेट दिला जाईल, असे संयोजक किशोर कानडे यांनी सांगितले. इच्छुकांनी ९१६८३८५५५५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून या रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन गोविंद देशमाने, तुकाराम कळसाईतकर यांनी संयोजन समितीच्या वतीने केले आहे.



# 'रेमडेसिवीर'साठी रूग्णांच्या नातेवाईकांची फरफट सुरूच

प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यातील कोरोना ग्रस्तांचा आकडा जस जसा वाढतोय तशी जिल्ह्याची परिस्थिती बिकट होत चालली आहे. रेमडेसिवीर इंजेक्शनसाठी कोरोनाग्रस्त नातेवाईकांची मोठी फरफट पाहायला मिळतेय.

अनेक नातेवाईक इंजेक्शन मिळवण्यासाठी मागील तीन दिवसांपासून जिल्हा प्रशिक्षण केंद्राबाहेर मुक्कामी आहेत. जिल्हा प्रशिक्षण केंद्राबाहेर रेमडेसिवीर इंजेक्शन मिळवण्यासाठी कोरोनाग्रस्त रुग्णांचे नातेवाईक मागील तीन दिवसांपासून इंजेक्शन मिळवण्यासाठी या ठिकाणी मुक्कामी आहेत. मात्र, तरीदेखील त्यांना रेमडीसिवीर इंजेक्शन मिळाले नाही. कोरोना रुग्णांची संख्या जशी वाढतेय, तशी रेमडीसिवीर इंजेक्शनची मागणी वाढू लागलीय. या ठिकाणी आलेले नातेवाईक दिवस दिवस उपाशी पोटी राहून इंजेक्शन मिळेल या आशेवर आहेत. मात्र, निराशाच हाती येतेय, काळ्या बाजारात इंजेक्शनची किंमत अव्वाच्या सव्वा लावली जाते. दरम्यान, त्यामुळे हे सर्व जण सरकारी आरोग्य विभागाचे उंबरठे झिजवत आहेत.







# रॉयल केअर कंपनीला आग

## दोन कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज

प्रतिनिधी

माजलगाव : येथील नवीन मोंढ्यातील तेल पॅकिंग करणाऱ्या युनिटला गुरुवारी पहाटे अचानक आग लागली. यात दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

येथील नवीन मोंढ्यात संतोष अब्बड यांच्या मालकीचे महावीर ट्रेडिंग व तेल पॅकिंग करणारी रॉयल केअर कंपनी आहे. गुरुवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याने याठिकाणी असलेल्या खाद्यतेल व त्याचे पॅकिंग साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. या ठिकाणी पॅकिंगला लागणारे प्लास्टिक पुडे व तेलामुळे आग जास्त भडकली. या ठिकाणी पॅकिंग करण्यासाठी असलेल्या मशिन जळल्या आहेत. रात्र असल्यामुळे याठिकाणी वॉचमन वगळता कोणीच नव्हते. आगीचे वृत्त समजताच परिसरातील लोक तसेच व्यापाऱ्यांनी आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले.

तब्बल नऊ तासांनंतर आगीवर नियंत्रण

तेलामुळे भडकलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले होते. आगीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव नगरपालिका, लोकनेते सुंदरराव सोळंके कारखाना, गेवराई नगरपालिकेच्या अग्निशामक दलांना पाचारण केले होते. तब्बल नऊ तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळविता आले. आग कशाने लागली, हे स्पष्ट झाले नाही. आगीत दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती कंपनी मालक संतोष अब्बड यांनी दिली.

# वडवणीत संभाजी ब्रिगेडतर्फे डॉ.आंबेडकर जयंती साजरी

प्रतिनिधी

वडवणी : जगातला एकमेव व्यक्ती ज्याने रक्ताचा एक थेंब सुद्धा न सांडता आपल्या लेखणीच्या बळावर सामाजिक, राजनैतिक, धार्मिक, अशा अनेक प्रकारच्या क्रांती घडवून आणली अशा महान युगप्रवर्तक, क्रांतिकारक, महान अर्थशास्त्रज्ञ, जगात भारताची मान आदराने उंचावणारे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संभाजी ब्रिगेडतर्फे देवगाव येथे अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमात बाबासाहेब सुरवसे, ग्रामसेवक आयुब पठाण, मुकुंद सुरवसे, राहुल सुरवसे, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष गवळी लहू, ईतापुरे सर, दादा जाधव, विलास कारके, अनिल पौळ, नितीन पौळ, भूषण सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते गवळी सुरेश, ग्रामरोजगार सेवक आकाश दरेकर, विष्णू नाईकनवरे, गवळी सर आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी राष्ट्रनिर्माते, प्रज्ञासूर्य, बोधिसत्व, महामानव, जगातील आदर्श राज्यघटनाकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३० व्या जयंती उत्सवानिमित्त त्यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. यावेळी त्यांचे विचार मांडण्यात आले. हा छोटेखानी कार्यक्रम देवगावात पार पडला. अशाप्रकारे माजलगाव तालुक्यातील प्रत्येक नागरिकाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती घरातच साजरी करण्याचे ठरवत कोरोनाच्या युद्धात आपले मोठे योगदान दिले आहे.



# रक्तदान शिबिरासाठी नोंदणी करा : रमेश सोळंके

प्रतिनिधी



माजलगाव : कोविड-१९ चा वाढता प्रकोप लक्षात घेता रूग्णांना रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माजलगाव तालुका आणि रमेशबप्पा सोळंके मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करावी. असे आवाहन रमेश सोळंके यांच्या वतीने करण्यात आले आहे.

कोरोना संसर्गाच्या काळात जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी आमदार प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सदर रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. इच्छुक युवक, रक्तदात्यांनी आपला सहभाग नोंदविण्यासाठी कॉमेंट बॉक्समध्ये किंवा कार्यालयाशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी. नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रक्तदान शिबिराची तारीख व ठिकाण जाहीर केले जाईल.

कोरोना लढाईत आपण खारीचा वाटा म्हणून रक्तदान शिबिरात कोरोना योध्दा म्हणून सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक माजलगाव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांनी केले आहे.

# धारूरमध्ये कोविड नियंत्रण कक्ष २४ तास ऑनड्युटी

प्रतिनिधी

धारूर : कोविड रूग्णांचे नियंत्रण करण्यासाठी धारुर शहरातील तहसील कार्यालयात २४ तास कोविड नियंत्रण कक्ष सुरू राहणार आहे, अशी माहिती तहसीलदार वंदना शेडोळकर यांनी दिली.

धारुर तालुक्यात कोरोनाचा प्रार्दुभाव झपाट्याने वाढत आहे. तो नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी प्रयत्न सुरू केले आहेत. कोरोनाच्या बाबतील नागरिकांच्या तक्रारी व कोविड केंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्यासाठी तहसील कार्यालयात नियंत्रण कक्ष सुरु केला असल्याचेही तहसीलदार शेडोळकर यांनी सांगितले. या कक्षामध्ये २४ तास शिक्षकाची नेमणूक केली असून, शिक्षकांनी कोविड बाबतीत दूरध्वनीवर येणारे कॉल स्विकारून लागलीच, त्या बाबतीमध्ये उपाययोजना करावयाच्या आहेत. याबाबत नागरिकांना काही तक्रारी असल्यास त्यांनी संपर्क साधावा.

## वर्तमान हेल्पलाईन

माजलगावातील महत्त्वपूर्ण क्रमांक

| | |
|---|---|
| शिवभोजन | ७७०९०९१६१६ |
| न.प.पाणी पुरवठा | ९६६५३६६३४५ |
| जीवनदायी ब्लड बँक | ९१७२५७९४७१ |
| शासकीय रूग्णालय | ९४२२९३२५०७ |
| वीज वितरण | ०८४११००२१३३ |
| योगायोग गॅस एजन्सी | ०२४४३ २३६०९७ |
| शहर पोलीस ठाणे | ९४२३५३०५०० |
| ग्रामीण पोलीस ठाणे | ०२४४३ २३४०३३ |

# सचोटीचा व्यवहार प्रगतीचा मार्ग

## 'शिव प्रोव्हीजन'च्या उद्घाटनप्रसंगी संजय सोळंके यांचे प्रतिपादन







प्रतिनिधी

माजलगाव : नवउद्योजकांनी व्यवसायात उतरून आपली प्रगती साधावी. सचोटीचा व्यवहार हा प्रगतीचा मार्ग आहे, असे प्रतिपादन किराणा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सोळंके यांनी केले. ते 'शिव प्रोव्हीजन'च्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

शहरातील मस्जिद चौक, मुख्य रस्त्याच्या मार्गावर गणेश तोडकरी यांनी शिव प्रोव्हीजन उभारले आहे. या प्रोव्हीजनच्या उद्घाटनाला संजय सोळंके यांच्यासह अमित श्रीश्रीमाळ, निळकंठ महाजन, कृष्णा कानडे, विजय मते, तुकाराम कळसाईतकर, गोविंद देशमाने, विजय पांचाळ, प्रशांत सातपुते, भगीरथ तोडकरी, दीपक तोडकरी आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना संजय सोळंके म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात नवउद्योजकांनी हिरिरीने सहभागी होवून आपल्या जीवनात प्रगती साधावी. जेणेकरून इतरांनी त्याचा आदर्श घेतला पाहिजे. कोणताही व्यवसाय लहान-मोठा नसतो. मोठी असते ती मेहनत, मेहनतीच्या जोरावरच गणेश तोडकरी सारखा तरूण पुढे येत आहे. त्याचे कौतुकच झाले पाहिजे, असेही गौरवोद्गार संजय सोळंके यांनी काढले. याप्रसंगी संजय सोळंके यांचा उद्घाटक म्हणून तर कलावंत तुकाराम कळसाईतकर यांचा वाढदिवसानिमित्त गौरव करण्यात आला. सर्वाचे आभार शिव प्रोव्हीजनचे प्रोप्रायटर गणेश तोडकरी यांनी मानले.

## माजलगावातील ॲब्युलन्स सेवा



| | |
|---|---|
| शासकीय ग्रामीण रूग्णालय | १०८ |
| शिवसेना | ९७६४६७३१७१ |
| अलफलाह कमिटी | ९४२१०६१७१० |
| रोटरी क्लब | ७७४४८२२१०८ |
| यशवंत हॉस्पीटल | ७५५८७१७२०९ |
| देशपांडे हॉस्पीटल | ९८२३९२१११२ |
| श्री सिध्देश्वर संकुल | ९४०३६०७४७९ |
| सफा बैतुल माल | ९३२५२५२५६३ |
| नागनाथ कार्डियाक | ८८३०२३९११९ |

आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**